राज्यातील रब्बी २०१८-१९ हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१८/प्र.क्र.२३७/म-७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ०६ जुलै, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१८/प्र.क्र.२३७/म-७, दिनांक :- ३ जून, २०१९
२) कृषि व पदुम विभाग / १० अे यांच्याकडून प्राप्त झालेले मदतीचे ज्ञापन दिनांक :- १० जून, २०१९.

प्रस्तावना :-

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करुन राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीतील पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता, पेरणीखालील क्षेत्र व पीकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी प्रभावित झालेल्या रब्बी तालुक्यामध्ये आपत्तीची शक्यता विचारात घेऊन संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ अन्वये राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर व चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर या ३ तालुक्यामधील रब्बी गावांमध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे.

रब्बी हंगाम सन २०१८-१९ मधील दुष्काळ घोषित केलेल्या उपरोक्त ३ तालुक्यांतील बाधित शेतक-यांना कृषि विषयक नुकसानीसाठी रूपये ५६.६१ कोटी इतकी मदत केंद्र शासनाकडून मिळण्यासाठी मदतीचे ज्ञापन केंद्र सरकारकडे दिनांक १० जून, २०१९ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे. केंद्र शासनाकडून सदर प्रकरणी निर्णय होऊन मदत मिळण्यास काही कालावधी जाण्याची शक्यता असल्याने राज्यातील दुष्काळी परिस्थिती विचारात घेवून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर व चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर या ३ तालुक्यातील १९५ गावांमधील शेतक-यांना राज्य शासनाच्या निधीतून रूपये ५६.६१ कोटी इतकी रक्कम वाटप करण्यासाठी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २८ जून, २०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्णयार्थ ठेवण्यात आला होता. या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर व चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर या ३ तालुक्यांमधील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील रब्बी हंगाम २०१८-१९ मध्ये संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर व चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर या ३ तालुक्यांमधील शेतीपिकांच्या झालेल्या पीक नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदानाचे वाटप

करण्यासाठी रक्कम रूपये ५६६१.०० लक्ष (रुपये पाच हजार सहाशे एकसष्ट लक्ष) खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वितरित करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हा	**जिरायतसाठी मदत (रू. लाखात)**	**बागायतसाठी मदत (रू. लाखात)**	**बहुवार्षिक पिकासाठी मदत (रू. लाखात)**	**एकूण आवश्यक रक्कम (रूपये लाखात)**
सोलापूर	३०२९.००	१७३१.००	८९४.००	५६५४.००
चंद्रपूर	२.००	५.००	०.००	७.००
एकूण	३०३१.००	१७३६.००	८९४.००	५६६१.००

२. वरीलप्रमाणे देण्यात येणारी मदत २ हेक्टरच्या मर्यादेत व लागवड केलेल्या क्षेत्राच्या मर्यादेतच राहील याची दक्षता घेण्यात यावी.

३. दुष्काळग्रस्त भागातील ३३% किंवा त्यापेक्षा अधिक शेतीपीकांचे नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना SDRF/NDRF च्या निकषानुसार निविष्ठा अनुदान देण्यात यावे. ३३ % पीक नुकसान ठरविण्यासाठी रब्बी खरीप हंगामातील अंतिम पैसेवारीसाठी त्या ग्रामपंचायती क्षेत्रात घेण्यात आलेल्या पीक कापणी प्रयोगाच्या निकालानुसार आलेल्या पीक निहाय उत्पन्नाचा आधार (weighted average काढण्यापूर्वी) घेऊन ६७ टक्क्यापेक्षा कमी उत्पन्न आलेल्या पिकांखालील क्षेत्रास निविष्ठा अनुदानासाठी पात्र ठरविण्यात यावे व त्या शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान वाटप करण्यात यावे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर पीक निहाय काढण्यात आलेले उत्पन्न हे त्या ग्रामपंचायती मधील सर्व गावांना लागू राहील.

४. सदर निविष्ठा अनुदान (Input Subsidy) हे शेती पीकाचे ३३% किंवा त्यापेक्षा जास्त नुकसान झालेल्या खातेदारांना वितरीत करण्यात यावे.

५. सदर मदतीचे वाटप २०१८-१९ मधील रब्बी हंगामातील ७/१२ वरील पीकाच्या नोंदीच्या आधारे करण्यात यावे.

६. बहुवार्षिक पिकांचे ३३ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त नुकसान झाल्याची शहानिशा शेतीनिहाय पंचनामे करुन करण्यात यावी.

७. बहुवार्षिक फळपिकांचे नुकसान ठरविण्याचा निकष ७/१२ मधील नोंद हा असेल. नुकसानीची तीव्रता ठरविण्यासाठी पंचनामा हा निकष असेल. बहुवार्षिक फळपिकांचे नुकसान ठरविण्यासाठी त्याची नोंद ७/१२ मध्ये आवश्यक आहे.

८. वनपट्टे धारकांना व ज्यांचे वनदावे प्रलंबित आहेत अशा सर्व शेतकऱ्यांना देखिल निविष्ठा अनुदानासाठी पात्र समजण्यात यावे व त्यानांही अनुज्ञेय असलेली मदतीची रक्कम प्रदान करण्यात यावी.

९. सन २०१८-१९ च्या रब्बी हंगामातील पीक पाहणी मधील पिकाच्या ७/१२ मधील उताऱ्यातील नोंदीबाबत कोणताही आक्षेप उद्भवल्यास त्याचे निराकरण महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमधील तरतूदीनुसार करण्यात यावे.

१०. बाधित शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करताना खालील अटी व शर्तीची पुर्तता करण्याची दक्षता घ्यावी :

१. मदतीची रक्कम संबंधित बाधितांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात यावी. कोणत्याही बाधितांना रोख अथवा निविष्ठा स्वरूपात मदत देण्यात येऊ नये.

२. हया मदतीची रक्कम खातेदारांच्या बँक खात्यावर थेट जमा करतांना मदतीच्या रक्कमेमधून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसुली करु नये.

३. बाधित शेतकऱ्यांना वाटप करावयाची मदतीची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या आधार संलग्नित बॅक खात्यामध्ये थेट हस्तांतर पध्दतीने (Direct Benefit Transfer) प्रदान करावी. परंतु एखादया व्यक्तीकडे आधार क्रमांक नसेल तर अशी व्यक्ती लाभापासून वंचित राहू नये म्हणून अन्य पर्यायी व व्यवहार्य ओळखपत्राच्या आधारे (उदा. आधार ओळख नोंदणी पावती, भारत निवडणूक आयोगाने दिलेले मतदान ओळखपत्र, आयकर विभागाने दिलेले स्थायी लेखा क्रमांक (PAN), वाहन चालविण्याचा परवाना, पारपत्र, बँकेची पुस्तिका ई.) खातरजमा करून प्रदान करण्यात यावेत.

११. या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, प्रधान लेखाशीर्ष - २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१, अवर्षण (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च (९१) (०५) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदत (२२४५ २४३४), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

१२. सदरहु आदेश हे प्रशासकीय मान्यतेचे असून निधी वितरीत करण्याबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७०६१३०३२२५७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash
Hanmant
Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.07.06 13:17:29 +05'30'

(सुभाष उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव
२. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
३. सर्व लोकसभा सदस्य / राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
४. सर्व विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य.
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
६. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग यांचे स्वीय सहायक,
७. अपर मुख्य सचिव (महसूल), महसुल व वन विभाग
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक

९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१०. सचिव (मदत व पुनर्वसन)
११. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
१२. आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. महालेखापाल -१ /२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
१४. महालेखापाल -१ /२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
१५. सर्व विभागीय आयुक्त
१६. सर्व विभागीय कृषि सह संचालक
१७. सर्व जिल्हाधिकारी
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२०. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२२. सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था
२३. वित्त विभाग, व्यय -९ / अर्थसंकल्प कक्ष / अर्थोपाय कक्ष), मंत्रालय , मुंबई.
२४. महसुल व वन विभाग, (म-७ / म११ / म-३), मंत्रालय, मुंबई-३२
२५. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी कृषि व पदुविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२६. निवड नस्ती, म-७ कार्यासन.